Regd.No. PCW/002/2021-2023-S.P.College Post-RNI No. 1755/1957

अखेरच्या कसोटीपूर्वी भारताचा कसून सराव

अहमदाबाद : भारत आणि इंग्लंड यांच्यातील चौथ्या आणि अखेरच्या कसोटी सामन्याला ४ मार्चपासून सुरुवात होणार आहे. भारतीय खेळाडूंनी या सामन्यापूर्वी कसून सरावाला सुरुवात केली आहे. बीसीसीआयने खेळाडूंचे सराव करतानाचे फोटो शेअर करून ही माहिती दिली.

भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेच्या निकालावर जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा अंतिम फेरीतील दुसरा संघ ठरणार आहे. उभय संघातील मालिकेत भारतीय संघाने सध्या २-१ अशी आघाडी घेतली आहे. भारतीय संघाला जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्याचे तिकीट मिळवण्यासाठी चौथा सामना अनिर्णित किंवा जिंकावा लागेल. इंग्लंडने हा सामना जिंकला तर ऑस्ट्रेलियाचा संघ अंतिम सामन्यासाठी पात्र ठरणार आहे.

चौथ्या कसोटीआधी भारतीय संघाने सराव सत्रात धाम गाळला. बीसीसीआयने खेळाडूंचे सराव करतानाचे फोटो शेअर केले आहेत. भारतीय संघ इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या कसोटी सामन्याची तयारी करत आहे, असे कॅप्शन बीसीसीआयने फोटो शेअर करताना दिले आहे. इंग्लंड संघाने चेन्नईत झालेला पहिला सामना २२७ धावांनी जिंकला. यानंतर चेन्नईतच झालेल्या दुसऱ्या सामन्यातभारतीय संघाने३१७ धावांनी विजय मिळवत मालिका बरोबरीत आणली. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममधील डे-नाईट सामना भारतीय संघाने अवघ्या २ दोन दिवसांत जिंकला. भारतीय संघानेअहमदाबाद कसोटीत १० गडी राखून विजय मिळवत मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली.

न्यूझीलंड-ऑस्ट्रेलिया यांच्यातील सामन्यांच्या ठिकाणांत बदल

ऑकलंड : न्यूझीलंडमधील सर्वात मोठे शहर ऑकलंडमध्ये कोरोनाने डोके वर काढले आहे. यामुळे ऑकलंडमध्ये पुन्हा लॉकडाऊन करण्यात आला आहे. गेल्या महिन्याभरात दुसऱ्यांदा लॉकडाऊन करण्यात आले आहे. याचा फटका न्यूझीलंड विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरू असलेल्या टी २० मालिकेवर झाला आहे.

ऑस्ट्रेलियाचा संघ न्यूझीलंड दौऱ्यावर आहे. या दौऱ्यात ऑस्ट्रेलिया न्यूझीलंड विरुद्ध ५ सामन्यांची टी २० मालिका खेळवण्यात येत आहे. या मालिकेतील २ सामने खेळण्यात आले आहेत. या दोन्ही सामन्यांमध्ये न्यूझीलंडने विजय मिळवला आहे. दरम्यान लॉकडाऊन लागल्याने उभय संघातील चौथ्या आणि पाचव्या सामन्याचे ठिकाण बदलण्यात आले आहे.

आता न्यूझीलंड विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यातील चौथा आणि पाचवा टी २० सामना वेलिंग्टनमध्ये खेळवण्यात येणार आहे. तर या सामन्यांमध्ये प्रेक्षकांना मैदानात उपस्थित राहून सामन्यांचा आनंद घेता येणार नाही, याबाबतची माहिती न्यूझीलंड क्रिकेट मंडळाने सोमवारी दिली. याआधी या चौथ्या आणि पाचव्या सामन्याचे आयोजन हे ऑकलंड आणि माउंट मांगुनईमध्ये करण्यात आले होते. उभय संघात मालिकेतील तिसरा सामना ३ मार्चला खेळवण्यात येणार आहे. तर यानंतर चौथा सामना ५ तर पाचवा आणि शेवटचा सामना हा ७ मार्चला खेळण्यात येणार आहे.

श्रीलंकेच्या क्रिकेट संचालकपदी टॉम मुडी

कोलंबो : ऑस्ट्रेलियाचे माजी अष्टपैलू क्रिकेटपटू टॉम मुडी यांची श्रीलंकेच्या क्रिकेट संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. श्रीलंका क्रिकेटने सोमवारी ही माहिती दिली. श्रीलंका क्रिकेट संघाच्या तांत्रिक सल्लागार समितीच्या सूचनेनुसार दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडविरुद्ध श्रीलंकेच्या खराब कामगिरीनंतर मुडी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

श्रीलंका क्रिकेट मंडळाने मुडींसोबत तीन वर्षांचा करार केला आहे. या करारानुसार त्यांना ३०० दिवस अनिवार्य काम करावे लागेल. त्यांची नियुक्ती सोमवारपासून लागू झाली आहे.

मुडींच्या कार्यामध्ये येणाऱ्या दौऱ्यांच्या वेळापत्रकांचे विश्लेषण, घरगुती स्पर्धांची रचना, खेळाडूंचे कल्याण, शिक्षण आणि कौशल्य विकास, प्रशिक्षण आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांची रचना इत्यादींचा समावेश आहे. मुडी हे २००५ ते २००७ या काळात श्रीलंकेचे प्रशिक्षक होते. या काळात संघाने २००७ मध्ये वेस्ट इंडिजमध्ये खेळल्या गेलेल्या विश्वकरंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला होता.

मुंबई उपांत्यपूर्व फेरीत

हिमाचलचा २०० धावांनी पराभव

जयपूर : शार्दुल ठाकूर (९२), सूर्यकुमार यादव (९१) आणि आदित्य तरे (८३) या तिघांच्या खेळीच्या जोरावर मुंबईने विजय हजारे करंडक स्पर्धेत हिमाचल प्रदेशचा पराभव केला. मुंबईने सवाई मानसिंह स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात हिमाचलचा २०० धावांनी पराभव केला. एलिट ग्रुप डी मध्ये मुंबईचा हा सलग पाचवा विजय आहे. या ग्रुपमध्ये मुंबई २० गुणांसह पहिल्या स्थानी आहे. यासह मुंबईने स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

मुंबईने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकात ९ बाद ३२१ धावांचा डोंगर उभारला होता. प्रत्युत्तरादाखल हिमाचलचा संघ २४.१ षटकात १२१ धावांत गारद झाला. हिमाचलकडून मयांक डागरने सर्वाधिक नाबाद ३८ धावा केल्या. तर मुंबईकडून प्रशांत सोलंकीने चार गडी बाद केले. शम्स मुलानीने ३ तर धवल कुलकर्णीने २ गडी बाद केले.

मुंबईने प्रथम फलंदाजी केली. तेव्हा मुंबईचे आघाडीचे तीन फलंदाज अवघ्या ८ धावांवर माघारी परतले होते. यशस्वी जैस्वाल (२), पृथ्वी शॉ (२) आणि कर्णधार श्रेयस अय्यर (२) हे अपयशी ठरल्यानंतर फॉर्मात असलेल्या सूर्यकुमार यादवने मुंबईची पडझड रोखली. त्याने सर्फराज खानसह चौथ्या गड्यासाठी ४१ धावा जोडल्या. सर्फराजचा अडथळा जसवालने दूर केला. त्यानंतर सूर्यकुमार यादव आणि आदित्य तरे यांनी हिमाचलच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेतला.

सूर्यकुमार यादव डागरच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्याने ७५ चेंडूत १५ चौकारासह ९१ धावांची खेळी केली. मुंबईची अवस्था ३०.४ षटकात ५ बाद १४८ अशी झाली होती. तेव्हा आदित्य तरेने शार्दुलसोबत जोडी जमवत आक्रमक फलंदाजी केली. आदित्य ९८ चेंडूत ६ चौकार व १ षटकारासह ८३ धावांवर बाद झाला. तर शार्दुलने ५७ चेंडूत ६ चौकार आणि ६ षटकारासह ९२ धावा तडकावल्या. यापैकी ६० धावा या त्याने चौकार (६) व षटकार (६) खेचून अवघ्या १२ चेंडूत केल्या. त्याच्या या फटकेबाजीच्या जोरावर मुंबईला ९ बाद ३२१ धावांचा डोंगर उभारता आला.

एकदिवसीय मालिकेत रोहित, पंतला विश्रांती ?

मुंबई : भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिका संपल्यानंतर टी-२० आणि एकदिवसीय सामन्यांची मालिका होणार आहे. एकदिवसीय मालिकेत भारताचे तीन प्रमुख खेळाडू रोहित शर्मा, ऋषभ पंत आणि वॉशिंग्टन सुंदर यांना एकदिवसीय मालिकेत विश्रांती दिली जाऊ शकते. भारत आणि इंग्लंड यांच्यात २३ मार्चपासून एकदिवसीय मालिकेला सुरुवात होईल. रोहित शर्मा, ऋषभ पंत आणि वॉशिंग्टन सुंदरला आराम द्यायचे कारण म्हणजे ते मागच्या आयपीएलपासून लागोपाठ क्रिकेट खेळत आहेत. एवढा काळ बायो बबलमध्ये राहणे मानसिकदृष्ट्या खूप थकवणारे आहे. त्यामुळे या खेळाडूंना आराम दिला जाऊ शकतो.

फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाउंडेशनचा महिला सक्षमीकरणात पुढाकार

जागतिक महिला दिन विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सन्मान आणि सत्कार करण्याचा दिवस, पण वर्षभर कायम महिला सक्षमीकरणात पुढाकार घेऊन महिलांचा सन्मान फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि त्यांचे सीएसआर पार्टनर गेली २२ वर्षे सातत्याने करत आहेत. महिला शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवणे, महिलांसाठी 'हॉलिडे होम्स'ची संकल्पना उभारणी, आदिवासी महिलांसाठी अत्याधुनिक शौचालये बांधणी, मुलींच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती वाटप, सायकल वाटप, कौशल्य विकास प्रशिक्षण, बचतगटातील महिलांना आधार अशा विविध उपक्रमांतून फिनोलेक्स इंडस्ट्रीज व सीएसआर पार्टनर मुकुल माधव फाउंडेशनचा महिला सक्षमीकरणातील पुढाकार अतिशय उल्लेखनीय असा आहे. जागतिक महिला दिनाच्या (८ मार्च) निमित्ताने महिला सक्षमीकरणासाठी करत असलेल्या कार्याचा आढावा...

सुप्रकाशिता (स्वयम) प्रकल्प

• फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फाउंडेशनचा आणखी एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे नाशिक जिल्ह्यातील सिन्नरमध्ये सुरु असलेला सुप्रकाशिता हा उपक्रम. बायफ इन्स्टिट्यूट ऑफ सस्टेनेबल लाइव्हलीहूड अँड डेव्हलपमेंटच्या मदतीने ग्रामीण भागातील शेतकरी महिलांना सक्षम करण्यासाठी हा उपक्रम आहे. या उपक्रमात १०० महिलांना समाविष्ट करण्यात आले असून, पिकाचे उत्पन्न वाढविण्यासाठी तंत्रयुक्त शेती राबविण्यात येत आहेत. महिला शेतकऱ्यांना क्षमता विकसासाठी प्रशिक्षण दिले असून, आता या १०० महिलांना आणखी १००० महिलांना सक्षम बनविणार आहेत. खेड्यातील महिला शेतकऱ्यांमध्ये शेतीचे तंत्र रुजवले जात असून, गावपातळीवर माहिती, सेवा आणि उत्पादन या गोष्टी पोहोचत आहेत. यशस्वी महिलांची उदाहरणे समोर येताहेत. सिन्नरमधील पास्ते, जामगाव, खापराळे, चंद्रपूर या गावात हा उपक्रम सुरु आहे. या शेतकरी महिला अतिशय उत्तम कामगिरी करत असून, पिके, फळभाज्या, पालेभाज्या पिकवत आहेत.

आदिवासी, शेतकऱ्यांना सहकार्य

• फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि सीएसआर पार्टनर मुकुल माधव फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील आदिवासींच्या हितासाठी काम करीत आहे. पिकाचे नुकसान, जलसंधारणाचा अभाव, दुष्काळ आणि पडलेले मालाचे भाव यामुळे शेतकरी आत्महत्या करतो. विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकरी सर्वाधिक आत्महत्या करतात. फिनोलेक्स इंडस्ट्रीज गेल्या अनेक वर्षांपासून पाईप्स अँड फिटिंग्जच्या माध्यमातून शेतकऱ्यांशी, शेती क्षेत्राशी निगडित आहे. तर गेल्या २२ वर्षांपासून मुकुल माधव फाउंडेशन सामाजिक दायित्व जपत महिलांच्या, वंचित घटकांच्या उन्नतीसाठी कसोशीने काम करत आहे. शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी जलसंवर्धनाचे अनेक प्रकल्प राबविण्यात येत आहेत. शेतीच्या मशागत, शेतकऱ्यांच्या मुलांचे शिक्षण, त्यासाठी शिष्यवृत्ती आणि त्यांच्या मुलांना चांगला आहार पुरविण्यासाठी मुकुल माधव फाउंडेशन काम करत आहे.

मासिक पाळीच्या काळात 'हॉलिडे होम्स'चा आधार

• फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाउंडेशनचा 'हॉलिडे होम्स' हा आणखी एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प. डिसेंबर २०१९ पासून त्याचा काम सुरु झाले असून, देशातील मागास २५० जिल्ह्यांपैकी एक असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात तो राबवला जात आहे. मासिक पाळीच्या काळात वेगळे राहण्यासाठी बाईला स्वतंत्र झोपडी असते. या चार दिवसाच्या काळात बाईला त्या झोपडीत नाईलाजाने राहावे लागते. ही झोपडी सामाजिक, आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षित नसते. ही बाब लक्षात आल्यानंतर फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाडिया संकल्पनेतून या महिलांना मासिक पाळीच्या काळात स्वतंत्र, सुरक्षित, सर्व सोयींनी युक्त असे 'हॉलिडे होम' उपलब्ध जात आहे. आदिवासी भागातील या नागरिकांच्या प्रथेला धक्का न लावता पर्यावरणपूरक, सुरक्षित घर उपलब्ध करून देत आहे. येथे महिलांना आपल्याला शिक्षा दिल्याची भावना निर्माण होणार नाही, तसेच त्यांना आनंदी, निरोगी आणि स्वावलंबी बनवून सक्षमीकरणासाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या एका घरात आठ बेडची सोय असून, ४-५ दिवसासाठी आठ महिला राहू शकतात. हे अतिशय हवेशीर असून, येथे सौरऊर्जेतील दीन फॅन, लाईट, बाल्कनी, स्वच्छतागृह असणार आहे. त्यांची सॅनिटायझेशनची व्यवस्था असेल. १ मे २०२१ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होईल.

विधवा महिला शेतकऱ्यांना आधार

• उस्मानाबाद जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिला शेतकऱ्यांसाठी फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाउंडेशनने पुढाकार घेतला. ३१२ विधवा महिला शेतकऱ्यांना स्वबळावर शेती करण्यासाठी तयार केले आहे. साईस्नेह आणि पर्याय फाउंडेशन यांच्या सहकार्याने फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाउंडेशनने दुष्काळग्रस्त उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब व वाशी तालुक्यातील गावांत हा उपक्रम राबविला जात आहे. या महिला शेतकऱ्यांना जमीन अधिग्रहण, शेती प्रशिक्षण, पॅकेजिंग, मार्केटिंग यासंदर्भात सहकार्य दिले. आज या ३१२ महिलांपैकी ६० टक्के महिला आपल्यावरील कर्ज फेडण्यास, तसेच मुलांचे शिक्षण करण्यास सक्षम झाल्या आहेत. कृषी विज्ञान केंद्र, पुण्यातील सामना ॲड टेक्नोलॉजी यांच्या सहकार्यातून या महिला शेतकऱ्यांना उत्पादकतेचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यामध्ये सोया दूध बनवणे, मधनिर्मिती करणे आदी गोष्टींचा समावेश होता. यासह शेतीला जोडव्यवसाय सुरु करण्यासाठी अन्य कौशल्य प्रशिक्षणही देण्यात आले. या महिला आज आत्मनिर्भर झाल्या आहेत.

आदिवासींसाठी ५५९ शौचालये

• मुंबईपासून ११५ किलोमीटरवर असलेल्या पालघर जिल्ह्यातील आदिवासी गावांत २०१७ पासून स्वच्छता आणि जलसंवर्धनाचे मोठे काम उभारले आहे. येथील लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने खेरवाडी सोशल वेलफेअर असोसिएशनच्या सहकार्याने विविध ठिकाणी सोनाळे, वडवली, विहरे, कोंढ, कालखाव, केळठण, सांबेगाव या गावांत एकूण ५५९ शौचालय उभारण्यात आली आहेत. आधुनिक शौचालयांच्या उभारणीमुळे ही गावे आता हागणदारीमुक्त झाली आहेत. येथे हिंदुजा फाउंडेशन, ग्रोइंग फ्यूचर्स आदी संस्थांचे सहकार्य लाभले आहे. येथील शेतकऱ्यांसाठी तीन गावात जलसंवर्धनाचे काम झाले असून, नाले, बंधारे, पाणाच्या टाक्या बांधून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे विहरे, झाडखेरे, कोंढ या गावातील हजारो लोकांना याचा फायदा झाला आहे.

FinOlex PIPES

Mukul Madhav Foundation

कौशल्य प्रशिक्षण व शिष्यवृत्ती

• महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाउंडेशनने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. शिवणकाम प्रशिक्षण हा त्याचाच एक भाग. खेरवाडी सोशल वेलफेअर असोसिएशनच्या मदतीने शिलाई मशीनची प्रशिक्षण, शिवकाम, साडी पेटीकोट शिवणे, लहान बाळांचे कपडे, मास्क, सॅनिटरी नॅपकिन, कापडी पिशव्या आदी गोष्टींचे प्रशिक्षण तज्ज्ञांकडून दिले जाते. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी शासकीय कृषी महाविद्यालयातील विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती, उद्योग-व्यवसाय करू इच्छिणाऱ्या महिलांना प्रोत्साहन, बचत गटातील महिलांच्या पाठीशी उभे राहत, शौर्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या महिलांना सन्मानित करत फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फाउंडेशन सातत्याने महिला सक्षमीकरणाचा वसा जपत आहे.

मुकुल माधव फाउंडेशनअंतर्गत एचआयव्ही पॉझिटिव्ह मातांना पोषण आहार आणि शरीर विक्रय करणाऱ्या महिलांना पुनर्वसनासाठी नियमित समुपदेशन केले जाते. शिवाय त्यांना महिन्याला जीवनावश्यक साहित्य दिले जाते. या एचआयव्ही पॉझिटिव्ह महिलांना शिलाई मशिनही देण्यात येतात. त्यांनी आज 'कपडा' हा आंतरराष्ट्रीय स्तरावरचा ब्रँड निर्माण केला आहे. आयटीआय शिक्षणाच्या तरुणींना प्लॅनिंगमधील कौशल्य प्रशिक्षण दिले जातेय.

अशिक्षित ज्येष्ठ महिलांसाठी आजीबाईची शाळा हा अनोखा उपक्रम राबविण्यात येत आहे. जुन्नर तालुक्यातील १०० महिलांना प्राथमिक शिक्षण दिले जाते. तसेच ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील १०० महिलांना सायकल वाटण्यात आल्या आहेत. आरोग्याच्या दृष्टीने वर्षभरात उपचार, मोतीबिंदू व अन्य प्रकारच्या तपासण्यांची शिबिरे आयोजिली जातात.

ग्रामीण, शाश्वत विकासाचे ध्येय

• फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे सीएसआर पार्टनर असलेल्या मुकुल माधव फाउंडेशनची स्थापना १९९१ मध्ये झाली. पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टअंतर्गत नोंदणी असलेल्या मुकुल माधव फाउंडेशनने शाश्वत, दूरगामी आणि दर्जेदार प्रकल्प राबविण्याची परंपरा जपली आहे. महिला सक्षमीकरण, आरोग्य, शिक्षण, सामाजिक विकास, स्वच्छता, कौशल्य विकास आणि जलसंवर्धन हे सामाजिक सरोकार लक्षात घेऊन फाउंडेशनने आजवर काम केले आहे. ग्रामीण व शहरी भागातील गरीब, गरजू व वंचित घटकांना समतेच्या लोकांना बरोबर घेऊन मदतीचा हात देण्याचा प्रयत्न विविध उपक्रमांद्वारे फिनोलेक्स इंडस्ट्रीज संचालित मुकुल माधव फाउंडेशनचा असतो. गावपातळीवर शाश्वत विकासाची गंगा पोहोचून तिथल्या लोकांना त्याचा लाभ होईल, यावर फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाडिया यांचा कटाक्ष असतो. फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फाउंडेशनने राबविलेल्या प्रत्येक प्रकल्पातील तळमळ, प्रामाणिकपणा अधोरेखित होतो. केलेल्या खर्चाचे, कामाचे मूल्यांकन करण्यासह लाभार्थ्यांच्या जीवनातील परिवर्तनाचा अभ्यास केला जातो. ग्रामीण भागातील सर्वांगीण विकास करण्यावर छाडिया यांचा भर आहे.

बदल घडणे जरी अटळ असला तरी तो घडवून आणण्यासाठी सांस्कृतिक आणि पारंपरिक अडथळे पार करावे लागतात. कोणत्याही निर्णय घेण्यापूर्वी या सर्व गोष्टींचा विचार करावला हवा. बदल घडवून आणण्यासाठी आणि परिणाम घडविण्यासाठी कोणती पावले उचलणे आवश्यक आहेत हे ठरवण्यासाठी सद्य परिस्थिती आढावा घेणे ही तेवढेच महत्त्वाचे असते, असे रितू प्रकाश छाडिया म्हणतात.

> फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाउंडेशनच्या पारदर्शक सेवेमुळे अनेक संस्थांकडून सीएसआर कामगिरी करण्यात आला आहे. सामाजिक बांधिलकीचे उपक्रमांतर्गत संपूर्ण भारतातील आमचे कर्मचारी चांगली कामगिरी करत आहेत. विविध उपक्रमांमध्ये ते सहभागी होत असतात. प्रत्येक उपक्रम आम्ही चांगल्या पद्धतीने राबवित आहोत आणि लोकांना त्याचा फायदा होतोय हे बघून फार आनंद होतो.
>
> **– प्रकाश छाडिया,**
> कार्यकारी अध्यक्ष, फिनोलेक्स इंडस्ट्रीज

> समाजातील प्रत्येक वंचित घटकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे, त्यांचे जीवन आनंदमय व्हावे, यासाठी फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाउंडेशनने नेहमीच पुढाकार घेतला आहे. महिलांच्या समस्या सोडवून, त्यांना प्रशिक्षित व स्वावलंबी करून सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. महिलांमधील अफाट क्षमतेला वाव देत मिळाले, तर हीच महिला समाजाच्या, देशाच्या प्रगतीत मोलाचे योगदान देऊ शकेल. संपूर्ण ग्रामीण विकासाच्या दृष्टीकोनातून काम करणे म्हणजे ग्रामीण भागातील लोकांना प्रशिक्षित आणि निरोगी जीवन जगता आले पाहिजे. तसेच नागरिकांमध्ये स्वशासन आणणे गरजेचे आहे. 'लाईव्ह टू गिव्ह' हे तत्त्व घेऊन छाडिया आणि फिनोलेक्स परिवार काम करत आहे.
>
> **– रितू प्रकाश छाडिया,**
> व्यवस्थापकीय संचालक, मुकुल माधव फाउंडेशन